MHAH170004202022

## विशेष दिवाणी दावा क्र.३/२०२२ मधील नि.२४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ व ९ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रदद होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. त्यांनी अर्जात असे कथन केले की, काही महत्त्वाची माहिती व जुने कागदपत्रे मिळून न आल्यामुळे ते दाव्यात त्यांचे म्हणणे दाखल करु शकलेले नाही. करीता त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रदद करण्यात यावा व प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी अशी त्यांनी शेवटी विनंती केली आहे.

२. वादीने नि. २६ अन्वये सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांनी अर्ज खरा व कायदेशीर नसून प्रतिवादीस समन्स बजावणी झाल्यानंतर त्यांना कैफियत देण्याची पुर्ण संधी देण्यात आली होती. परंतू प्रतिवादी हे जाणीवपूर्वक कैफियत उशीराने कैफियत दाखल करीत आहेत. वादीस त्रास देण्याच्या हेतूने वादीने सदरचा अर्ज दिला आहे. करीता अर्ज नामंजूर करण्यात यावा, मंजूर केल्यास प्रतिवादीस रक्कम रु.५,०००/– नुकसान खर्च करण्यात यावा असे त्यांनी शेवटी म्हणणे मांडले आहे.

३. अर्ज, त्यातील कथनाच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.३ ने दिलेले प्रतिज्ञापत्र (नि.२५) आणि अर्जावर वादीकरीता विधीज्ञांनी दिलेला खुलासा वाचला. दाव्यातील कागदपत्रांची पाहणी केली. दि.१७.०३.२०२२ रोजी प्रतिवादी हे दाव्यात हजर झाले परंतू त्यांनी वेळेत कैफियत दिली नाही त्यामुळे दि.०२.०७.२०२२ रोजी त्यांचे विरुध्द दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश करण्यात आला. त्यानंतर दि.१५.१२.२०२२ रोजी प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी यांना पुरेपुर संधी देण्यात आली असल्याचे दिसून येते.

करीता प्रतिवादींनी दिलेले कारण योग्य व संयुक्तीक असल्याचे दिसून येत नाही. परंतू दाव्याचा विषय आणि सदर प्रतिवादीचा त्याच्याशी असलेला संबंध विचारात घेवून त्याला त्याची बाजू ठेवण्याची संधी देणे न्याय योग्य आहे. परंतु त्याचवेळी झालेला विलंब पहाता वादीस खर्चही देणे उचित आहे. करीता मी वरील विवेचनावरुन खालील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज खर्च रक्कम रु.१,०००/– आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. खर्च पुढील तारखेपर्यंत भरल्यानंतरच लेखी कैफियत स्वीकारली जाईल याची नोंद घ्यावी.

राहाता. ( आदिती आर. नागोरी )

दि.०६.०१.२०२३. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

राहाता